## माझं बालपण कुठे गेलं

सांगना आई, सांगना माझ बालपण कुठे गेलं
एवढया लहान वयात तू माझ लग्न कशाला केलसं
लहान होती तेव्हा कामाला पाठविले
माझे बालपण तू घरातच साठविले
एवढया लहान वयात तू मला माझ्या सासरी पाठविले
सासरी मला त्यांनी चुली पुढे राब राब राबविले
देवा, सांग तू यांना माझे आईवडील कशाला बनविले
तूच सांग देवा आता माझे बालपण कुठे हरविले
घरात माझ्या बालपणाला लावला टाळा
गळयात घालू दिल्या नाही साध्या मोत्यांच्या माळा
दिल तर दिल काय काळया मोत्याच्या माळा घालायला गळयात
आणि एवढया लहान वयात पाठविले मला सासराच्या मळयात
या सासरच्या कठीण आयुष्यात तू मला कशाला गुतविले
तूच सांग मला आई, माझे बालपण कुठे हरविले

**वृषाली अशोक पाटील**

(TE-EXTC)

## जीवन गणित

जीवनात प्रत्येक गोष्टीला लिमिट असते,
सुख दुःखाची नेहमी बेरीज बजाबाकी असते
स्वभावाला प्रेमाने गुणांचे असते,
कष्टास मनोरंजनाने भागावे लागते
परनिंदेचा ल.सा.वि करावा लागतो,
सद्गुणाचा वर्ग करावा
शेवटी उरते ते 'किती'

**By Kalpana Brahmane**

**(TEEXTC)**

# मातृदेवो, पितृदेवो भव

विसरा सर्वांना पण आईवडिलांना कधी विसरू नका,

अनंत उपकार आहेत त्यांचे ही गोष्ट कधी विसरू नका!

मुखांतील घास काढून ज्यांनी तुम्हाला मोठे केले,

अमृत पाजले तुम्हाला तुम्ही त्यांच्यासाठी विष ओकू नका!

भविष्य आपले उज्ज्वल व्हावे म्हणुन त्यांनी खुप कष्ट केले,

रक्त आटले त्यांचे काम करून त्यांना कधी विसरू नका!

लाखो कमवित असाल तुम्ही पण आई वडिलांपेक्षा जास्त नाही,

जसे कराल तसे भरा हा न्याय कधी विसरू नका!

पैसे तर खुप मिळतील पण आई वडिल काय मिळतील,

क्षणोक्षणी त्या चरणी पावलांचा आदर करणे तुम्ही विसरू नका!

उपकार तर त्यांचे कधी फेडता न यावे पण त्यांना कधी अपमानित करू नका,

खुप मोलाचे असतात आईवडिल हे कधी विसरू नका!

आयुष्यात सर्व पैशातुन घेता येईल पण आईवडिलांचे प्रेम कधी घेता येणार नाही,

म्हणून आईवडिलांना कधी विसरू नका!

अडचणिच्या वेळी सर्व बाजूला निघतील पण आईवडिल नेहमी साथ देतील,

अशा आईवडिलांना कधी विसरू नका!

किती उपकार असतात त्यांचे अशा आईवडिलांना कधी विसरू नका!!!

**वृषाली अशोक पाटील**

(TE-EXTC)